जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

**संपादक**
डॉ. अशोक ढवळे

**कार्यकारी संपादक**
विजय पाटील

**संपादक मंडळ**
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

**मुद्रक/प्रकाशक**
डॉ. अशोक ढवळे

**अक्षरजुळणी**
आत्माराम पडवळ

**मुखपृष्ठ व मांडणी**
केतन शिंदे

**व्यवस्थापक**
चंद्रकांत शिंदे

**प्रसिद्धी स्थळ**
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# राजकीय पक्षांचा निधी : राजकारणातील प्रचंड पैशाला सहाय्यभूत!

**प्रकाश करात**

देशातील राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीसंदर्भात कोणतीही पारदर्शक पध्दत नाही हे अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात मान्य केले आणि भारतातील राजकीय पक्षांच्या निधी जमा करण्याच्या पध्दतींची साफसफाई करुन ही चूक सुधारण्याच्या उद्देशाने तीन उपाय प्रस्तावित केले.

१) राजकीय पक्षाला रोखीने जास्तीत जास्त रुपये २०००ची देणगी प्रती व्यक्तीकडून स्विकारता येईल.

२) ही रक्कम चेकने अथवा डिजीटल पध्दतीने स्विकारावी लागेल.

३) निवडणूक रोखे काढले जातील जे चेकने अथवा डिजीटल पध्दतीद्वारे अधिकृत बँकेकडून विकत घेता येतील. या रोख्यांचे विमोचन नोंदणीकृत राजकीय पक्षांनी निर्देश केलेल्या खात्यात रोख्यांच्या प्रसिध्दीपासून ठराविक काळाच्या मर्यादेत करता येईल.

राजकीय पक्षांच्या निधीसाठी विशेषत: निवडणूकीसाठी जो बेकायदेशीर आणि काळा पैसा मुख्य राजकीय पक्षांद्वारे प्रचंड प्रमाणात वापरला जातो त्यावर नियंत्रण ठेवणे हा खरा मुख्य प्रश्न आहे. मात्र तो प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने या नकारात्मक उपायांचा फारसा उपयोग होणार नाही.



आजाच्या कायद्याप्रमाणे राजकीय पक्षाला २०,००० आणि त्यावरील रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचा नाव,पत्ता आणि पॅन क्रमांक असा तपशील देणे बंधनकारक आहे. प्रस्तावित उपायात रोख २००० रुपयांची मर्यादा घालण्यात आलेली आहे. यातून बेकायदेशीर पैसा स्विकारला गेला आहे की नाही, याचा काहीच उलगडा होणार नाही. यामुळे २००० रुपयांखालील रोख देणग्या देणे अधिकच सुकर होईल. त्यापेक्षा, २००० रुपयांची देणगी रोखीने दिलेली असो अगर चेकने किंवा डिजीटल पध्दतीने, त्या देणगीदाराचा सर्व तपशील आता जसा २०,००० अथवा त्याखालील देणगीदारांकडून घेतला जातो तसा घेतला जावा.

निवडणूक रोख्यांची संकल्पना अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात मांडली. पण राजकीय पक्षांच्या निधीबाबत पारदर्शकता आणण्याच्या त्यांच्या उद्देशाशीच ती विसंगत आहे. अर्थमंत्र्यांच्या मते, चेक अथवा इतर पारदर्शक पध्दतीने देणगी देण्यास देणगीदार नाखूष असतात, कारण आपली ओळख उघड होऊन आपल्याला वाईट परिणामांना तोंड द्यावे लागेल, असे त्यांना वाटते.

बेकायदेशीर अथवा काळा पैसा देणगी म्हणून देताना हाच युक्तीवाद कॉर्पोरेट कंपन्या आणि व्यावसायिक करत असतात, या निवडणूक रोख्याच्या योजनेत काळा पैसा देणगी म्हणून देणाऱ्या देणगीदाराची ओळख उघड होणार नाही. या निवडणूक रोख्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या देणग्यांचा स्त्रोत उघड करणे राजकीय पक्षांना बंधनकारक नसावे, अशी आयकर कायद्यात सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

२०,००० किंवा त्यावरील रक्कम जर निवडणूक रोख्यांच्या मार्गे आली असेल तर आयकर खात्याकडे भरण्यात येणाऱ्या रिटर्न्समध्ये देणगीचे तपशील देणे राजकीय पक्षांना बंधनकारक नाही, या पातळीपर्यंत हा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

यावरुन राजकीय पक्षांच्या देणग्यांबाबत पारदर्शता आणण्याच्याऐवजी मोदी सरकार निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून अनामिक देणग्यांचा मार्ग मोकळा करून देत आहे. याला अपवाद आहे, हे निवडणूक रोखे कोणी खरेदी केले याची माहीती सरकार बँकांकडून केव्हाही मागवू शकेल. अर्थात या रोख्यांचे नेमके स्वरुप अजून स्पष्ट व्हावयाचे आहे. पण बेअरर रोख्यांच्या स्वरुपात जर हे रोखे आले तर त्याचा प्रचंड गैरवापर होण्याची शक्यता आहे. मोठ्या प्रमाणावर रोख्यांत पैसा घालून त्यातून कर चुकविण्याचे मार्ग व साधने शोधली जातील. या रोख्यांचा उपयोग राजकीय पक्ष-कम-व्यवसाय असा करण्यासाठीही अनेक धाडसी मार्ग उपलब्ध होऊ शकतील.

हे प्रस्तावित बदल सुधारणा म्हणून संबंधित कायद्यात अर्थविधेयकाद्वारे समाविष्ट केले जातील. असे करुन सरकार हे बदल अर्थविधेयकाद्वारे करण्याचा प्रयत्न करीत आहे. याचा अर्थ, राज्यसभा राजकीय पक्षांच्या निधीबाबत आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाबाबत काहीच चर्चा करू शकत नाही.

आयकर कायदा आणि नागरिकांच्या प्रतिनिधीत्वाच्या कायद्यातील प्रस्तावित सुधारणांचा भारताच्या अर्थसंचयाशी किंवा कररचनेशी काहीच संबंध नाही. त्यामुळे त्या सुधारणांना अर्थविधेयकाचे निकष लावता येणार नाहीत. राज्यसभेला डावलण्यासाठी अर्थविधेयकाच्या संकल्पनेचा हा गैरवापर होत आहे.

राजकीय निधी संदर्भात आम्ही पारदर्शकता आणत आहोत, हा सरकारचा दावा संशयास्पद आणि दांभिक आहे. २०१६-१७च्या गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात 'फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्युलेशन ॲक्ट'मधील सुधारणा अर्थविधेयकाद्वारे प्रस्तावित केल्या गेल्या होत्या. त्या प्रस्तावित सुधारणांचा उद्देश होता विदेशी कंपन्यांच्या भारतीय सहाय्यक कंपन्या ज्या देणग्या देतात त्या देणग्यांचा स्त्रोत भारतीय मानण्यात यावा.

ही सुधारणा पूर्वलक्ष्यी अंमलात आणली गेली. कारण त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयाचा भाजप आणि काँग्रेस या दोघांनाही कायदा मोडत विदेशी देणग्या स्विकारण्याबद्दल दोषी ठरविणारा निर्णय निष्प्रभ ठरत होता. ह्या देणग्या लंडन येथे मुख्य कचेरी असणाऱ्या वेदांत या कंपनीने दिल्या होत्या. ही सुधारणा अर्थविधेयकाच्या मार्गाने करण्यात आली. आता राजकीय पक्षांना बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतीय सहाय्यक कंपन्यांकडून देणग्या स्विकारणे कायदेशीर झाले आहे.

आता या निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून बहुराष्ट्रीय कंपन्या कोणत्याही आडकाठीविना राजकीय पक्षांना निधी पुरवू शकतील. खरे तर मोदी सरकारने या सुधारणेद्वारे राजकीय पक्षात थेट विदेशी गुंतवणुकीला परवानगीच दिली आहे.

या राजकीय निधीच्या आणि निवडणूक खर्चाच्या प्रश्नाला वर्गीय कंगोराही आहे. निवडणूक आयोग असो अगर सरकार हे दोघेही राजकीय पक्षांकडे आणि निवडणूक व्यवस्थेत हा बडा पैसा वाहता राहण्याच्या विरोधात अजिबात नाहीत, फक्त तो कायदेशीरपणे वाहावा.

राजकीय पक्षांना कॉर्पोरेट कंपन्यांनी निधी पुरविण्याबाबत भाजप आणि काँग्रेस या दोघांतही सहमती आहे. निवडणूक खर्चावर मर्यादा असावी असे दोघांनाही वाटत नाही. उदाहरणार्थ, २०१४च्या लोकसभा निवडणूकात भाजपने शेकडो कोटी रुपये छापील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमावरील जाहीरातींसाठी खर्च केले होते, त्याचप्रमाणे खासगी विमाने आणि हेलीकॉप्टर भाड्याने घेण्यासाठीही प्रचंड रक्कम खर्च केली होती.

दुसऱ्या बाजूला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष राजकीय पक्षांच्या कॉर्पोरेट देणग्यांच्या विरोधात आहे. त्या ऐवजी जर गरज असेल तर कॉर्पोरेट कंपन्या निवडणूक आयोग नियंत्रित निधीला देणग्या देतील, ज्यातून शासन निवडणुकीच्या दरम्यान राजकीय पक्षांना निधी देऊ शकेल.

सध्याच्या नवउदारवादी नीतीशास्त्राप्रमाणे भांडवलदारी पक्ष निवडणूका लढविण्यासाठी धनशक्तीच्या आहारी जात असलेले दिसून येते. वाईट म्हणजे निवडणूक आयोग धनशक्तीचा वापर करणाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा उगारत नाही तर सर्वसामान्य लोकांकडून रोखीत आलेल्या छोट्या देणग्यांवर घाला घालते. निवडणूक आयोग निवडणूक प्रचारासाठी मर्यादित आर्थिक स्त्रोत असलेल्या राजकीय पक्षांकडून खर्च कमी करण्याच्या दृष्टीने वापरली जात असलेली पोस्टर्स, बॅनर्स यांचा वापर करण्यावर प्रतिबंध लादते आणि टेलीव्हीजन आणि छापील माध्यमे आणि खर्चिक फलकबाजीवर भर देणाऱ्या जाहिरातबाजीला प्रोत्साहन देते.

अशाच प्रकारचा वर्गीय दृष्टीकोन 'असोसिएशन ऑफ डेमॉक्रॅटीक रिफॉर्मर्स' सारख्या बिगर सरकारी संघटनांचा असतो. या संघटना हंड्या, डबे किंवा बादल्यांतून अनामिक जनसामान्यांकडून होणाऱ्या निधिसंदर्भातील गुणदोष काढत बसतात, पण राजकीय पक्षांना टेबलाखालून आणि औपचारिक हिशोब प्रक्रियेबाहेरून मिळत असलेल्या प्रचंड रकमांमागचे हात शोधून काढण्यासाठी काहीही करत नाहीत.

राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीसहित सर्वच बाबतींतील निवडणूक सुधारणांची आज तातडीची गरज आहे. त्याची सुरूवात खालील उपाय योजून करायला हवी,

१) निवडणुकीदरम्यान विविध कारणांसाठी होणाऱ्या राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चासाठी एक सर्वसाधारण मर्यादा निश्चित केली पाहिजे. उदाहरणार्थ, सार्वत्रिक निवडणुकीसाठी राजकीय पक्षाचा ५००कोटी रुपयांचा जाहिरातीवरील खर्च कायदेशीर असेल त्या बद्दल काहीही प्रश्न विचारता येणार नाही. काळ्या पैशाची भूमिका जर निवडणुकीतून नष्ट करायची असेल तर निवडणूक खर्चावर मर्यादा घातल्याच पाहिजेत.

२) उमेदवाराच्या वतीने पक्षाने केलेला खर्च हा उमेदवाराच्याच निवडणूक खर्चात दाखवली जाणारी सुधारणा नागरिकांच्या प्रतिनिधित्वाच्या कायद्यातील संबंधित कलमात केली गेली पाहिजे.

३) राजकीय पक्षांना दिलेल्या २००० रुपये आणि त्यावरील सर्व देणग्यांचा तपशील देणगीदाराचे नाव व इतर तपशीलानिशी जाहीर करावयास हवा.

४) निवडणूक रोख्यांद्वारे देणगी स्विकारणाऱ्या पक्षाने त्याचा संपूर्ण तपशील जाहीर करावयास हवा.

५) नोंदणीकृत राजकीय पक्षांना जाहिरात सामुग्री, जाहीरनामा, वाहतुकीसाठी इंधन व तत्सम बाबींसाठी शासनामार्फत निधी देण्यात यावा.

६) राजकीय पक्षांना काळ्या पैशात देणग्या देणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे किंवा राजकीय पक्षांवरही असा पैसा स्विकारल्याबद्दल दंड ठोठावला पाहिजे.

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# मोदी राजवट ही तर वसाहतवादी ब्रिटिशांपेक्षाही अधिक धोकादायक!

## जमीन, शेती व उपजीविकेवरील कॉर्पोरेट आक्रमणाचा किसान सभा प्रतिकार करणारच!

१५ व १६ फेब्रुवारी २०१७ रोजी अखिल भारतीय किसान सभेच्या केंद्रीय कमिटीची बैठक नवी दिल्लीत पार पडली. या बैठकीत, जमीन, शेती व उपजीविकेच्या साधनांवर देशभरात कॉर्पोरेट विश्वाकडून जे आक्रमण होत आहे, त्याविरुद्ध सर्व समविचारी डाव्या व प्रगतिशील विचारांच्या शेतकरी, शेतमजूर, दलित आणि आदिवासी संघटनांना सोबत घेण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकरी व आदिवासी समुदायावर ज्या-ज्या क्षेत्रात हल्ले होत आहेत, अशा सर्व समान प्रश्नांवर प्रचंड जनआंदोलन उभारण्याचा किसान सभेने निर्धार केला.

## जमिनीच्या लुटारूंना विरोध करणाऱ्यांचे खून जनता कदापि सहन करणार नाही!

अलिकडच्या काही महिन्यांत देशाच्या विविध भागांत पोलिसांनी शेतकऱ्यांवर ठिकठिकाणी गोळीबार केले, कित्येक शेतकऱ्यांचे खून पाडले. या सर्व घटनांविषयी बैठकीत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली, तसेच त्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. प. बंगाल राज्यात बेकायदेशीरपणे जमीन बळकावणाऱ्यांचा शांततेच्या मार्गाने निषेध करणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसने पोलिसांकरवी गोळीबार केला. यात आलमगीर शेख व मोफिझुल खान या भांगर येथील शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. आसाम मधील काझिरंगा प्रदेशात, सरभानंद सोनोवाल यांच्या भाजप सरकारने शेतकऱ्यांना आपल्या जमिनीवरून जबरदस्तीने हुसकावून लावण्याच्या प्रयत्नांत गोळीबार केला. या गोळीबारात अंजुमा खातुम या महिलेसह फकरुद्दीन हा इसमही ठार झाला. तर झारखंड राज्यात, भाजपच्या नेतृत्वाखालील रघुवीर दास सरकारच्या पोलिसांनी विविध ठिकाणी जो गोळीबार केला, त्यांत एकूण सात आदिवासी मारले गेले. खुटी जिल्ह्यातील सायको गावात अब्राहम मुंडा, रामगढ जिल्ह्यातील रतु या गावात राम रतन महातो, तर हजारीबाग जिल्ह्यातील बाकरा गावात रंजन दास, अभिषेक राय, माहतूब आलम आणि पवन साओ अशी या मृत आदिवासींची नावे आहेत. आपल्या जमिनी हातच्या जाऊ नये, म्हणून शांततापूर्ण मार्गाने प्रतिकार करणाऱ्या या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांचे मृत्यू जनता कदापि सहन करणार नाही.

हे सर्व खून आदिवासींच्या प्रचंड खनिज संपत्ती असलेल्या जमिनीवर डोळा ठेवून, जमिनी कसणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांना आपल्या जमिनींतून हुसकावून लावण्याच्या कॉर्पोरेट कारस्थानाचाच भाग आहेत. मोदी सरकारला आपला कुप्रसिद्ध भूमी अधिग्रहण वटहुकूम शेतकऱ्यांच्या तीव्र संघटित विरोधामुळे मागे घ्यावा लागला. त्यामुळे आता हे सरकार राज्य सरकारांनी आपल्या अखत्यारीतील कायदे वापरून या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकवाव्या म्हणून त्यांना प्रोत्साहन देत आहे. या प्रकारात आदिवासींवर सर्वात जास्त भीषण प्रहार जर कोणी केला असेल, तर तो आहे झारखंड राज्यातील रघुवीर दास यांच्या भाजप सरकारने. झारखंडच्या विधानसभेने छोटा नागपूर येथील १९०८ सालचा कूळ कायदा व संथाल परगण्यातील १९४९ चा कूळ कायदा २३ नोव्हेंबर २०१६ला कुठलीही चर्चा न होऊ देता फक्त २.५७ मिनिटांत आवाजी मतदानाने पास केला.

छोटा नागपूर अधिनियम-१९०८ हा जमिनीचे एकाच जातीतील व भौगोलिक प्रदेशातील हस्तांतरण रोखण्याचे काम करतो, तर संथाल परगणा अधिनियम-१९४९ अंतर्गत शहरी तसेच ग्रामीण भागातील जमीनही अहस्तांतरणीय आहे. हे दोन्ही कूळ कायदे घटनेच्या नवव्या परिशिष्टानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय जनतेचा विकास जलदगतीने व्हावा व त्यांच्या जमिनींचे संरक्षण व्हावे, या हेतूने न्यायालयीन कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहेत. अनुसूचित क्षेत्रांतील आदिवासींच्या जमिनींचे संरक्षण व्हावे म्हणून १९९६ साली विशेष ‘पेसा कायदा’ अस्तित्वात आला. या पेसा कायद्यांतर्गत कुठलीही जमीन ताब्यात घेण्यापूर्वी ग्रामसभा अथवा ग्रामपंचायतीची मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

हे दोन्ही अधिनियम संथाल परगण्यातील सिंधू कान्हू आणि छोटा नागपूर परिसरातील बिरसा मुंडा या आदिवासी नेत्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आदिवासी जनतेच्या प्रदीर्घ लढ्यामुळे करण्यात आले आहेत. ब्रिटिश सरकारने १९०८ चा कायदा केला. घटनेच्या पाचव्या परिशिष्टानुसार या कायद्याद्वारे आदिवासी, दलित व इतर मागासवर्गीयांना घटनेचे संरक्षण लाभले असून त्यांत कोणतेही बदल केले जाऊ शकत नाहीत. मात्र त्यांत दुरुस्त्या करून भाजप सरकारने, कष्टाने पास झालेला पेसा कायदा व घटनेच्या पाचव्या परिशिष्टातील तरतुदींची विल्हेवाट लावली आहे. यावरून सरकारला भारताची घटना व आदिवासींचे अधिकार या दोन्हींविषयी काडीचा आदर नाही, हे स्पष्ट होते. आपल्या कॉर्पोरेट मालकांना खुष करण्याकरता गरीब बिचाऱ्या आदिवासींच्या व शेतकऱ्यांच्या मुळावर हे सरकार उठले आहे. हे बघता, वसाहतवादी ब्रिटिशांपेक्षा हे मोदी सरकार जास्त जुलमी असल्याचाच निष्कर्ष निघतो. किसान सभेच्या केंद्रीय कमिटीने एका ठरावाद्वारे भारतीय संसदेला विनंती केली आहे, की त्यांनी झारखंड राज्यातील भाजप सरकारविरुद्ध कडक कारवाई करावी, या सरकारने घटनेचा केलेला अवमान कदापि सहन करू नये, तसेच आदिवासी जनतेच्या अधिकारांचे रक्षण करावे. रांची येथे ३० मार्च २०१७ रोजी शेतकऱ्यांचा एक प्रचंड मेळावा भरवण्यात येणार आहे. या मेळाव्याला सरचिटणीस हन्नन मोल्ला व उपाध्यक्ष मदन घोष मार्गदर्शन करतील.

## मोदी सरकारविरुद्ध संयुक्त प्रश्नांवर लढे उभारण्यास एकत्र येण्याचे आवाहन

आधीच आर्थिक अरिष्टाने ग्रासलेल्या शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मोदी सरकारच्या नोटाबंदीने पार कंबरडे मोडले आहे. शेतमालाचे कोसळलेले

भाव, प्रचंड वाढलेली बेरोजगारी, प्रत्येक शेतकऱ्यांपासून व्यापाऱ्यांपर्यंत सर्व घटकांचे कमी झालेले उत्पन्न, मनरेगाच्या कामांना आलेले शैथिल्य हे सर्व या नोटाबंदीचेच परिणाम आहेत. बँकांच्या रांगांत तासन्‌तास उभे राहिल्यामुळे किंवा नोटाबंदीमुळे नोकऱ्याच गमावल्याच्या, मुलांची लग्ने मोडल्याच्या धक्क्यामुळे एकूण १५० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मोदी सरकारचे या वर्षीचे बजेट हे तर संपूर्णपणे शेतकरीविरोधी असल्याची टीका होत आहे. भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात दिले गेलेले शेतमालाला उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के अधिक किफायतशीर भाव मिळवून देण्याच्या आश्वासनाला तर मोदींनी अनेकदा हरताळ फासला आहे. गरीब व मध्यम शेतकऱ्यांना कर्जमाफीदेखील मिळाली नाही. केंद्र सरकारने पंतप्रधान विमा योजनेच्या नावावर शेतकऱ्यांच्या पिकांची नुकसान भरपाई न करून त्यांची शुद्ध फसवणूक केली आहे. गेल्या दोन ते अडीच वर्षांत शेतकरी आत्महत्यांत ४२ टक्के वाढ झाली आहे. काँग्रेस प्रणित यूपीए-२ सरकारच्या काळात या आत्महत्यांची संख्या दर दिवशी ४३ होती, ती वाढून आता दर दिवशी ५२ इतकी झाली आहे.

## तीव्र दुष्काळ व उपासमारीचे संकट

देशभरातील ३०० हून अधिक जिल्ह्यांत, विशेषत: तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांत दुष्काळ व उपासमारीने भयंकर रूप धारण केले आहे. मात्र, याचे दुष्परिणाम भोगणाऱ्या हजारोंच्या संख्येतील जनतेला दिलासा देण्याकरता सरकार काहीही सुरक्षात्मक उपाय योजण्यास तयार नाही.

## भूमी अधिकार आंदोलनाचा सर्व राज्यांत विस्तार

येत्या तीन महिन्यांत, भूमी अधिकार आंदोलनाने धर्मांध व नवउदारवादी शक्तींविरुद्ध लढणारा देशातील सर्वात मोठा किसान मंच बनण्याच्या दृष्टीने प्रत्येक राज्यात पोहोचण्याची तयारी चालवली आहे. केंद्रीय किसान कमिटीने त्यास संपूर्ण पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

ग्रामीण भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व संघ परिवारातील इतर संघटनांनी शेतकऱ्यांमध्ये जाती-धर्माच्या नावावर फूट पाडण्याचा प्रयत्न चालवला आहे. देशभरात धर्मनिरपेक्ष व पुरोगामी शक्तींना संघटित करून प्रचंड मोहीम किसान सभेच्या वतीने चालवण्यात येणार आहे. भारतीय जनतेत द्वेषाचे विष पसरवून त्यांच्यात फूट पाडण्याचा व पर्यायाने देशाला खिळखिळा करण्याच्या प्रयत्नांना हाणून पाडण्याकरता गाव पातळीवर मोहीम आखण्यात येईल.

## ३४ वे अखिल भारतीय अधिवेशन ऑक्टोबर २०१७ मध्ये हरियाणात हिस्सार येथे

किसान सभेचे चौतिसावे अखिल भारतीय अधिवेशन ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात हरियाणा राज्यात हिस्सार येथे भरवण्याचा निर्णय केंद्रीय कमिटीने घेतला आहे. २५ राज्यांतून ७३१ प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित राहतील. अधिवेशनात उत्तर भारतातील राज्यांत किसान चळवळ मजबूत करण्याच्या दृष्टीने ठोस कार्यक्रम आखण्यात येईल, तसेच नवउदारवादी धोरणे व धर्मांध शक्तींविरोधात देशभरात विविध प्रश्नांवर वर्गसंघर्ष व जनसंघर्ष मजबूत करण्यावर देखील भर देण्यात येईल.

## वीज दरवाढीविरोधात राजस्थानात सुरु असलेल्या किसान आंदोलनाप्रती भ्रातृभाव

भाजपच्या नेतृत्वाखालील वसुंधरा राजे यांच्या सरकारने वीज दरात प्रचंड वाढ केली आहे. याविरुद्ध तेथील शेतकऱ्यांच्या प्रचंड लढ्याला केंद्रीय कमिटीने संपूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. २ मार्च २०१७ रोजी जयपूर येथे राजस्थानच्या विधान भवनावर शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा निघणार असून त्यात अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष आमरा राम, सरचिटणीस हन्नन मोल्ला व सहसचिव डॉ. अशोक ढवळे उपस्थित राहणार आहेत.

**(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

---

## <u>(मोदी सरकारची 'नोटाबंदी'... पान ८ वरून)</u>

आल्या होत्या?, या संसदेच्या पब्लिक अकाऊंट कमिटीने (PAC) वित्तखात्याला विचारलेल्या विशिष्ट प्रश्नाला उत्तर देताना वित्तखात्याने असे नमूद केले होते की, 'सीबीसी' (Central Board of Excise and Customs) खाली काम करणाऱ्या संस्थांनी (नोव्हेंबर ते ३० डिसेंबर या काळात कोणतेही बनावटी चलन जप्त केलेले नाही.'(२० जानेवारी २०१७, इंडियन एक्सप्रेस) नोटाबंदीचे पाऊल उचलण्यामागच्या राष्ट्रवादी कारणांपैकी एक महत्वाचे कारण असे की, नोटाबंदीमुळे दहशतवादी कारवायांसाठी शेजारच्या देशांकडून मिळणाऱ्या बनावटी नोटांचा प्रवाह थांबेल. परंतु हे उद्दिष्ठसुद्धा साध्य झाले नसल्याचे वित्त खात्याने दिलेल्या उत्तरातून दिसून येते. दहशतवाद्यांना निधी पुरविणारे मार्ग नुसत्या नोटाबंदीमुळे नष्ट होत नाहीत. काश्मीरमध्ये व इतर ठिकाणी मरण पावलेल्या दहशतवाद्यांकडे सापडलेल्या २००० रु.च्या नोटा पाहिल्या तर नोटाबंदी करून दहशतवादाचा मुकाबला करता येणार नाही, त्यासाठी दहशतवाद्यांना निधी पुरविणारे मार्ग बंद करायला हवेत, हे उघड होते.

वरील सर्व वस्तुस्थिती पाहिली तर सरकारने घोषित केलेल्या नोटाबंदीच्या तीन उद्दिष्टांपैकी कोणतेही उद्दिष्ट सरकारला साध्य करता आलेले नाही. हे दिसून येते.

आम्ही काढलेले निष्कर्ष दुसऱ्या कोणत्याही पर्यायी माहितीवर आधारित नसून, सरकारी तपशीलावर आधारलेले आहेत. वस्तुस्थिती ही अशी असली तरीही, 'हाती घेतलेली खास कामगिरी यशस्वी झाली आहे' अशी टिमकी मोदी सरकार का बरे वाजवीत आहे? सरकारने जाहीर केलेली नोटाबंदीची उद्दिष्टे ही 'नोटाबंदी'मागची मुख्य ध्येये नसून, नोटाबंदी लादण्यामागे सरकारचा एक अघोषित असा, हेतूपुरस्सरपणे आखलेला छुपा अजेंडा असे आमचे स्पष्ट मत आहे.

मोदी सरकारची ही चलाख खेळी समजून घेण्यासाठी पुढील भागात नोटाबंदीपायी कोणाला लाखीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले व नोटाबंदी कोणाच्या पथ्यावर पडली हे पुढील भागात पाहू.

**(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

# मोदी सरकारची 'नोटाबंदी' एक कावेबाज खेळी : घोषित उद्दिष्टे आणि त्यांचा फोलपणा भाग (१)

८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १००० व ५०० रुपयांच्या नोटा चलनातून रद्द करण्याचा सरकारचा निर्णय एकाएकी जाहीर केला. या दोन्ही रक्कमांच्या बाद केलेल्या नोटा म्हणजे एकूण चलनाचा तब्बल ८६ टक्के हिस्सा! राष्ट्राभिमानाला आवाहन करीत पंतप्रधान म्हणाले की, भ्रष्टाचार, काळा पैसा व बनावटी चलनी नोटा नष्ट करण्यासाठी तसेच दहशतवादी कणा मोडून पाडण्यासाठी नोटाबंदीचे पाऊल उचलणे आवश्यक होते. आणि हे करीत असताना नोटाबंदीच्या निर्णयाच्या परिणामकारकतेविषयी ज्यांनी ज्यांनी शंका व्यक्त केल्या त्यांच्यावर चक्क 'राष्ट्रद्रोही' व 'देशाभिमान नसणारे' असा शिक्का पंतप्रधानांनी मारला.

नोटाबंदीमुळे जनतेला त्रास सोसावा लागत आहे हे जरी खरे असले तरी, ५० दिवसांच्या मर्यादित कालावधीत हळूहळू त्यांचे जीवनमान सुरळीतपणे चालू राहिल असे आश्वासन देत पंतप्रधानांनी भ्रष्टाचार आणि काळा पैसा नष्ट करून आपला देश स्वच्छ करण्यासाठी जनतेने ही एवढी किमान किंमत मोजावी अशी गळ घातली. नोटाबंदी जाहीर केल्याला आता ८० दिवसांहून अधिक काळ लोटला आहे. आपल्या देशाच्या कष्टकरी श्रमिक जनतेला नोटाबंदीचा सर्वाधिक फटका बसला आहे. त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या दु:खाच्या बातम्या आल्या नाहीत असा एकही दिवस नाही. बँकांमध्ये जमा केलेले पैसे काढण्यावर सरकारने मर्यादा लादल्यामुळे, आपल्याच खात्यांतून आपले पैसे काढणे जनतेला अशक्य होऊन बसले आहे. तसेच बहुतेक एटीएम्सवर 'NO CASH'चे फलक झळकत असल्याचे पाहून जनता आणखी बेजार होत आहे.

> 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'चे गव्हर्नर उर्जित पटेल यांनी 'Standing Committee on Finance' ला असे कळविले आहे की, बाद केलेल्या १५.४४ लाख करोड नोटांच्या जागी जवळजवळ ९.२ लाख करोड नव्या नोटा चलनात आणल्या गेल्या आहेत. याचा अर्थ हा की, आधी चलनात असलेल्या अंदाजे ६.२४ लाख करोड चलनाची अजूनही अर्थव्यवस्थेत तूट आहे.

जनतेला सोसाव्या लागणाऱ्या सर्व हालअपेष्टांकडे सरकार जाणीवपूर्वक कानाडोळा करीत आहे. आपलेच पैसे काढण्यासाठी बँकांच्या रांगांमध्ये तासनतास उभे राहिलेल्यांपैकी १००हून अधिक जण जीवाला मुकले, हे मान्य करायला सरकार मुळीच तयार नाही. नोटाबंदीची कारवाई सुलभपणे पार पाडावी म्हणून पंतप्रधान म्हणाले होते की, लोकांवर बँकांच्या रांगामध्ये उभे रहाण्याची पाळी पुन्हा कधीही येणार नाही. त्यांच्यासाठी ही शेवटची वेळ असेल. मात्र मृत्यू पावलेल्या व्यक्तींसाठी रांगांमध्ये उभे रहाण्याची दुर्दैवाने हीच अखेरची वेळ ठरली. आणि हे सर्व घडत असताना २७ डिसेंबर रोजी नोटाबंदीची नियोजित कामगिरी यशस्वीरित्या पार पडल्याचे जाहीर करून हे असंवेदनशील सरकार जनतेच्या जखमांवर मीठ चोळीत आहे.

हाती घेतलेल्या नोटाबंदीच्या कामगिरीत सरकारला यश आले आहे असे जेव्हा सरकार म्हणते तेव्हा साहजिकच त्याचा अर्थ – आपल्या अर्थव्यवस्थेमधून काळा पैसा पूर्णत: नष्ट झाला आहे; बनावटी चलन काढून टाकण्यात आले आहे; आणि दहशतवादाचा आर्थिक कणा कायमचा मोडून टाकण्यात आला आहे– असा होतो. परंतु त्यानंतर प्रकाशात आलेला तपशील पाहिला तर सरकारच्या नोटाबंदीच्या कारवाईचे वस्तुत: कोणतेही उद्दिष्ट सफल न झाल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर नोटाबंदीच्या परिणामांपायी आपल्या अर्थव्यवस्थेची आणखी आर्थिक लूट करण्यास कॉर्पोरेट्सना मुक्त प्रवेश मिळाला आहे. जनतेच्या हालअपेष्टांमुळे विदेशी कंपन्यांना नफा लाटता यावा म्हणून आपल्या अर्थव्यवस्थेचे दरवाजे सताड खुले करण्यात आले आहेत.

आणि आता तर नवीन गोष्ट ही की, आपल्या रोखीच्या अर्थव्यवस्थेला रोखेविरहित अर्थात 'कॅशलेस' किंवा 'डिजीटल अर्थव्यवस्थेमध्ये बदलण्याचा सरकारचा मानस असल्याचे सरकारने जाहीर केले आहे. आपल्या देशामध्ये फार मोठ्या प्रमाणात नवउदारवादी सुधारणा लागू करण्याचा, 'डिजीटल अर्थव्यवस्था' हा हमखास मार्ग आहे. हाती घेतलेली कामगिरी यशस्वीरित्या तडीस नेण्याचे जेव्हा पंतप्रधान मोदींनी जाहीर केले होते, तेव्हा आपल्या देशात आणखी नवउदारवादी सुधारणांचा पाया रोवण्यात सरकारला यश आले असल्याचे त्यांना सुचवायचे होते का? एकंदरीत परिस्थितीतून सध्या तसेच संकेत मिळत आहेत.

## वस्तुस्थितीचा आढावा

नोटाबंदीमुळे काय साध्य झाले हे अजमवण्यासाठी वस्तुस्थिती पडताळून पाहू या.

**१) - नोटाबंदीचे पहिले उद्दिष्ट - काळा पैसा नष्ट करणे**


मोदी सरकारने अधिक मूल्यांच्या चलनी नोटा चलनातून बाद केल्यानंतर, १० डिसेंबरपर्यंत बँकांमध्ये १२.४ लाख करोड इतकी रक्कम जमा झाली होती, असे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) जाहीर केलेल्या, १३ डिसेंबर २०१६च्या अलिकडच्या तपशीलात म्हटले आहे. बँकांमध्ये जमा करण्यात आलेली ही प्रचंड रक्कम पाहून मोदी सरकारची भीतीने गाळण उडाली. लागलीच १० डिसेंबरनंतर बँकांमध्ये किती रक्कम जमा झाली याचा तपशील आरबीआय'ने देता कामा नये अशी ताकीद सरकारने आरबीआयला दिली होती.

नोटाबंदीच्या कारवाईनंतर ८० दिवसांहून अधिक काळ लोटल्यानंतरही चलनातून बाद केलेल्या जुन्या नोटांचा बरोब्बर आकडा आपल्याला माहित नाही' अशी थाप आरबीआय मारीत आहे व बँकांमध्ये जमा केलेल्या नोटांचा मेळ घालण्यात आरबीआय व्यग्र असल्याची सबब सांगितली जात आहे. संसदेच्या पब्लिक अकाऊंट कमिटीला (PAC) पाठविलेल्या लेखी निवेदनात आरबीआयने म्हटले आहे. 'चलनातून बाद करण्यात आलेल्या विशिष्ट मूल्यांच्या नोटांचा' (Specified Bank Notes) अचूक आकडा पडताळून पहाण्याचे प्रयत्न चालू आहेत.

'आरबीआय' अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन पळवाटा काढीत असली

तरी, पारंपारिक स्वरूपाचे काही विश्वसनीय अहवाल, चलनातून रद्द करण्यात आलेल्या १५.४४ लाख करोड नोटांच्या जवळजवळ ९० ते ९७ टक्के नोटा बँकांमध्ये जमा झाल्या असल्याचे सुचवितात. या व्यतिरिक्त असे काही विशेष अहवाल आहेत, ज्यांमध्ये बाद झालेली जवळजवळ १०० % रक्कम किंवा त्याहूनही थोडी जास्त रक्कम, बँकांमध्ये जमा झाल्याची नोंद आढळते. हा सर्व तपशील जर उघडकीस आला तर आपल्याला तोंड दाखवायला जागा रहाणार नाही या भीतीने सरकारने हा तपशील लोकांपर्यंत पोहोचूच दिला नाही.

पारंपारिक अहवालाचे अंदाज जरी आपण विचारात घेतले तरी, सरकारचे काळ्या पैशासंबधीचे दावे किती फोल आहेत ते लक्षात येते. अवैध ठरविलेल्या १५.४४ लाख करोड रक्कमेच्या कमीत कमी २० टक्के रक्कम बँकांमध्ये जमा केली जाणार नाही व ही बेहिशोबी काळी संपत्ती पैशाच्या रुपात असेल असा सरकारचा अंदाज होता. सरकारचा हा अंदाज जर खरा ठरला असता तर नोटाबंदीद्वारे काळा पैसा नष्ट करण्याचे आपले 'महान कार्य' सफल झाले असे सरकारला घोषित करता आले असते. परंतु बँकांमध्ये सरकारच्या अपेक्षेपेक्षा जास्त रक्कम जमा झाल्यामुळे सरकारची बोलती बंद झाली आहे; सरकार तोंडघशी पडले आहे. जे काही घडले त्यावरून काळ्या पैशासंबधी आम्ही जे जे मुद्दे मांडत आलो आहोत ते वास्तवाला धरून असल्याचे सिद्ध होते. ते मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :-




१. रोखीत असलेल्या पैशाची रक्कम फारच कमी म्हणजे, आपल्या अर्थव्यवस्थेतंर्गत असलेल्या एकूण काळ्या पैशाच्या केवळ ५-६ टक्के इतकी कमी आहे.

२ आपल्या अर्थव्यवस्थेतील एकूण काळा पैसा आपल्या सकल घरेलू उत्पादनाच्या (जीडीपी) २५-६२ टक्के इतका आहे.

३) या काळ्या पैशाचा बहुतांश हिस्सा (साधारणत: ५० टक्के) रिअल इस्टेट, जमिनी, सोने यात गुंतविण्यात आला आहे.

४) काळ्या पैशाचा आणखी एक मोठा हिस्सा भारतीयांची खाती असलेल्या परदेशी बँकांमध्ये आहे. व हवाला माध्यमातून परदेशी पाठविण्यात आला आहे.

या ठिकाणी २०१४ सालच्या निवडणूक प्रचार मोहिमेच्या दरम्यान भाजपने केलेल्या आश्वासनांची आम्ही आठवण करून देऊ इच्छितो. त्यावेळी भाजप म्हणाला होता. 'आम्ही जर सत्तेवर आलो तर स्विस बँकांमध्ये साठविलेला काळा पैसा तात्काळ परत आणला जाईल. एवढेच नव्हे तर या रकमेतून प्रत्येक भारतीय नागरिकाच्या खात्यामध्ये १५ लाख जमा केले जातील' भाजपच्या ५ वर्षाच्या कार्यकाळाची अर्धी वर्षे संपली तरी अजूनपर्यंत ठोस असे काहीही घडले नाही व भविष्यात काही घडेल अशी आशा नाही.

नोटाबंदीनंतर ज्यांच्याकडे पैशाच्या रूपात काळी संपत्ती होती ती पांढरी करून घेण्याची संधी त्यांना नोटाबंदीमुळे मिळाली. शिवाय नोटाबंदी काळ्या पैशाच्या स्रोतांवर हल्ला करू शकत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. नोटाबंदी नंतरच्या पहिल्याच सहा आठवड्यांत इन्कमटॅक्स खात्याने घातलेल्या छाप्यांमध्ये जप्त केलेल्या ५०० कोटी रुपयांमध्ये चक्क ९२ कोटी म्हणजे २० टक्के रक्कम नव्या २०००च्या नोटांमध्ये पकडली गेली होती हे लक्षात घेण्याजोगे आहे.

## नोटाबंदीचे दुसरे उद्दिष्ट : बनावटी चलन नष्ट करणे

वित्तखात्याने, संसदेच्या पब्लिक अकाऊंट कमिटीकडे (PAC) पाठविलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, ८ नोव्हेंबर २०१६ पासून २० डिसेंबर २०१६ या कालावधीत सरकारी विभागांनी कोणत्याही बनावटी नोटा जप्त केल्या नव्हत्या. (२० जानेवारी २०१७, इंडियन एक्सप्रेस). तसेच ८ नोव्हेंबरला १०००/५००च्या नोटा चलनातून बाद केल्यापासून कोणत्या मूल्यांच्या व किती बनावटी नोटा शोधून काढण्यात आल्या होत्या?, या 'आरटीआय'च्या प्रश्नाला उत्तर देताना, 'आपण केलेल्या विचारणेसंबंधी सध्या तरी आमच्यापाशी खात्रीचा तपशील नाही असे उत्तर आरबीआयच्या Department of Currency Management (Forged Notes Vigilance Dept.)ने पाठविले आहे. 'वित्तखाते' आणि 'आरबीआय' या दोघांच्या उत्तरावरून नोटाबंदीमागचे दुसरे उद्दिष्टसुद्धा साध्य करण्यात सरकार अपयशी ठरल्याचे स्पष्ट होते.

आपण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी होती ती ही की, आपल्या अर्थव्यवस्थेतील बनावटी चलन हे प्रत्यक्ष व्यवहारातील सर्व चलनी नोटांच्या ०.०००२ टक्क्यांपासून ०.०००८ टक्क्यांच्या दरम्यान असल्याचा अंदाज आहे. आणि ते सुद्धा २०१५ ते २०१६ मध्ये वसूल केलेले केवळ ३० करोड चलन धरून. बनावटी चलनाची ही क्षुल्लक रक्कम नष्ट करण्यासाठी १०००/५००च्या नोटा अवैध ठरवून चक्क ८६ टक्के चलन रद्द करणे म्हणजे आपल्या घरात घुसलेले उंदीर हाकलून काढण्यासाठी आपले घरच जाळून टाकण्याचा मूर्खपणा करणे नव्हे का?

## नोटाबंदीचे तिसरे उद्दिष्ट : बनावटी चलनी नोटांद्वारे दहशतवादी कारवायांना पुरविल्या जाणाऱ्या निधीला आळा घालणे


दहशतवादी गट, तसेच अंमली पदार्थ, शस्त्रास्त्रे यांचा बेकायदेशीर व्यापार करणारे चोरटे व्यापारी आणि परकीय गुप्तहेर यांच्याकडून ३० डिसेंबरपर्यंत ५०० व १००० रुपयांच्या किती बनावटी नोटा जप्त करण्यात

(पान ६ पहा)

# कॉम्रेड पानसरेंचा शब्द-कृती-प्रकल्प

डॉ. उदय नारकर

गेल्या दोन वर्षात कॉ. पानसरेंचा उल्लेख सतत विचारवंत असा होत आलेला आहे. नुसतेच विचारवंत नव्हे तर पुरोगामी विचारवंत असा. विविध प्रसारमाध्यमातून आणि सभासंमेलनातून तो होत असतो. अर्थात हा उल्लेख एका सकारात्मक अर्थानंच केला जात असला तरी, स्वत: कॉ. पानसरेंना तो फारसा उचित वाटला नसता. किमान तो अपुरं वर्णन करणारा वाटला असता. याचं कारण ते नुसतेच विचारवंत, अगदी पुरोगामी विचारवंत नव्हते. ते कृतीशील विचारवंत, पुरोगामी 'विचारवंत कार्यकर्ता' होते. त्यांच्या जीवनात विचार आणि कृती यांच्यात एक असीम एकत्व होतं. लेनिनचं एक वाक्य ते कधी विसरले नाहीत, आणि आपल्या सहकाऱ्यांना, अनुयायांनाही त्यांनी ते विसरू दिलं नाही. ते वाक्य म्हणजे, 'विचाराविना कृती अंध असते आणि कृतीविना विचार वांझ असतो.' विचार आणि कृती यांच्यातील हे एकत्व त्यांना मार्क्सवादाने शिकवलं होतं. आणि तो एकसंघतेचा ध्यास घेऊनच ते शेवटपर्यंत लढत राहिले.



ते बोलत - लिहीत राहिले याच एका उद्देशानं. त्यांच्यासाठी त्यांचा श्रोता हा केवळ श्रोता नव्हता; त्यांचा वाचक हा नुसता वाचक नव्हता. श्रवणातून, वाचनातून तो कृतीशीलतेकडे वळला नाही, तर ते त्यांच्यासाठी फजूल होतं. वाचन वा श्रवण, लेखन वा वक्तृत्व या काही स्वांत सुखाय अशा कृती नाहीत, असं ते मानत. त्यांनी माणसाला समाजात पुरोगामी बदल करण्यासाठी उद्युक्त केलं पाहिजे, अशी त्यांची धारणा होती, आणि आम्हाला त्यांनी शिकवलं ते हेच. त्यांच्या सोपं लिहिण्या बोलण्याचं हेच मर्म होतं. बोजड लिहिण्या - बोलणाऱ्यांविषयी त्यांना फारशी आत्मीयता वाटत नसे. 'खूप चांगले बोलला, पण काही कळलेच नाही!' अशी ते टिंगल करीत. त्यामुळे त्यांच्या उपस्थितीत आम्हाला जरा जपूनच बोलावं लागे. आणि त्याचा फायदाच झाला.

मी जे काही बरं वाईट लिहितो, त्यामागे कॉ. पानसरेंची प्रेरणा मोठी आहे, हे मी अगदी बिनदिक्कतपणे सांगू शकतो. माझं बोलणं, लिहिणं उपयुक्त ठरू शकतं, असा त्यांचा होरा असावा. आणि त्यासाठीच ते मला बोलायला, लिहायला लावीत. त्यांनी लिहिणं ही नुसती बौद्धिक कसरत आहे, असे कधीच मानलं नाही. त्यांच्यासाठी प्रत्येक शब्द हा राजकीय हस्तक्षेप होता. प्रत्येक शब्दानं कष्टकरी वर्गाला राजकीय बळ दिलं पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. आणि त्यासाठी त्यांनी एक 'शब्द-प्रकल्प' उभारला होता. त्या शब्द-प्रकल्पात ते अनेकांना सहभागी करून घेत. एका टप्प्यावर त्यांनी मलाही त्यात सहभागी करून घेतलं. सहभागी होताना लक्षात आलं, हा नुसता 'शब्द-प्रकल्प' नाही, 'शब्द-कृती-प्रकल्प' आहे.

या प्रकल्पात त्यांनी मला पहिलं दिलेलं काम म्हणजे त्यांच्या शिवाजी पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतराचं. आज शिवाजीविषयी बोलताना पानसरे हटकून आठवतातच. त्यांनी सांगितलेला शिवाजी हा महात्मा फुल्यांच्या परंपरेतला आहे. त्याला अनेक कंगोरे असले तरी शेवटी 'कुळवाडी भूषण' म्हणूनच पानसरेंनीही त्याच्या कार्याचा अर्थ लावला. शिवाजीची मराठी मनाला पडलेली भूल त्या कुळवाड्याच्या भागधेयामुळेच. जोवर हा कुळवाडी राबतोय, खस्ता खातोय तोवर शिवाजी त्याला प्रेरणा देतच रहाणार. म्हणून तर पानसरेंनी शिवाजीचं वर्णन 'रयतेचा राजा' असं केलं. शिवाजीनं त्या रयतेची सुटका दिल्लीपतीच्या जुलमातून तर केलीच, शिवाय गावच्या पाटील - देशमुख - कुलकर्ण्यांच्या शोषणातूनही केली. कुळवाडी हा गावगाड्याचा आत्मा आहे, हे दाखवून दिलं. आणि कुळवाडी हा जातवाचक शब्द नाही. तो कष्टवाचक आहे. त्यामुळेच तो सर्व जातींची, सर्व धर्मांची बंधने पार करू शकतो. आजचा कुळवाडीच समाजाला अन्नाचीच नव्हे तर सामाजिक जुटीची रसदही पुरवत आहे. एका बाजूला दिल्लीपती सरकार त्याला लुटत असताना आणि दुसरीकडे स्थानिक पाटील - देशमुख - कुलकर्णी त्याला गुलामीत ठेवत असताना खरा राष्ट्रभक्त आहे तो आजचा कुळवाडीच. 'शिवाजी कोण होता'च्या पानापानातून पानसरे सांगत असतात, जा, या शेतकऱ्याला त्याच्या सामर्थ्याची जाणीव करून दे.

गेल्या पंचवीस वर्षात जागतिक भांडवलशाहीनं या शेतकऱ्यालाच नव्हे तर औद्योगिक कामगाराच्याही आयुष्याची राखरांगोळी केली. पण भांडवलशाही स्वत:च अडचणीत येत असते. वारंवार. त्यानुसार २००८ साली जगाच्या अर्थव्यवस्थेला तिनं अरिष्टाच्या गर्तेत ढकलून दिलं. या अरिष्टाचा अर्थ कामगारांना, जनतेला समजला पाहिजे; त्यातून बाहेर पडायचा मार्ग दिसायला हवा, या विचारानं कॉ. पानसरे ग्रस्त झाले. आणि एक दिवस त्यांनी माझ्यावर त्याविषयी पुस्तिका लिहायची जबाबदारी टाकली. 'सोपं लिहितोस म्हणून', असे बजावायला विसरले नाहीत. प्रयत्न करूनही तो विषय सोपा होईना. त्यांनीच मार्ग सुचवला, प्रश्नोत्तरांच्या रूपात लिहून पहा. काम एकदम सोपं झालं. पुस्तिका झरझर लिहून झाली. बघता बघता पानसरेंनी ती छापून टाकली.

त्यांच्या या प्रकल्पाच्या कक्षेत एक विषय सतत घोळत असायचा. तो म्हणजे शिक्षण. बहुजनांचं शिक्षण हा म. फुल्यांपासून छ. शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटलांपर्यंत अनेकांच्या आस्थेचा विषय. हाच वैचारिक वारसा पुढे नेला पाहिजे ही पानसरेंची कायमची तळमळ. त्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षक संघटनांपासून ते प्राध्यापक संघटनांपर्यंत सर्वांना सतत आपल्या कामात सहभागी करून घ्यायचा प्रयत्न केला. स्वातंत्र्याच्या पहिल्या पन्नास वर्षात भांडवलदार बनलेल्या देशमुख - पाटलांनी शिक्षणसंस्थांवर, विशेषत: उच्च व्यावसायिक शिक्षण संस्थांवर कब्जा केल्याची त्यांना मनस्वी चीड असे. आपल्या समाज बदलाच्या कामात शिक्षणाचं खासगीकरण रोखण्याच्या कामाला त्यांनी प्राधान्य दिलं होतं. आता या देशमुख - पाटलांना परकीय भांडवलदारांशी दोस्ती करून त्यांच्या 'इंटरनॅशनल' संस्था, विद्यापीठं भारतात आणायचे वेध लागले होते. या

साऱ्या प्रश्नांचा सटीक अभ्यास करणारी एक पुस्तिका भारतातील शिक्षणतज्ज्ञांनी इंग्रजीत छापली होती. लागलीच पानसरेंनी ती माझ्याकडे पाठवून दिली. मी काय समजायचे ते समजलो. 'शिक्षणाचा मासळी बाजार' नावानं ती मी लिहिली, पानसरेंनी बिनबोभाट छापून टाकली.

कामगार नेता म्हणून मान्यता असली तरी त्यांच्या बारीक नजरेतून शेतकरी कधीच सुटला नाही. गेल्या पंचवीस वर्षात देशातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील शेतकऱ्याला देशोधडीस लावायचं काम काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस करत आला. सुरवातीला संकटमुक्त असलेला ऊस उत्पादक शेतकरीदेखील हळूहळू व्यापारी नफ्यावर आधारलेल्या बाजारपेठेच्या चक्रव्यूहात अडकू लागला. त्याला त्यात ढकलायचं पाप शरद पवारांनी केलंच, शिवाय शेतकरी संघटनेच्या शरद जोशींनीही धूर्तपणे केल्याची स्पष्ट मांडणी ते करत. शरद जोशी 'जातीयवादी गिधाडांच्या' थव्यात सामील झाल्याचा आरोप करून स्वाभिमानी राजू शेट्टींनी आपला सवता सुभा उभा केला. पानसरेंच्या डाव्या आघाडीत सहभागी होत त्यांनी खासदारकीही पदरात पाडून घेतली. शेवटी आपणही नफेखोर व्यापाऱ्यांचे दोस्तच असल्याचे सिद्ध करत तेही जागतिक भांडवलशाहीची तळी उचलून धरू लागले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या गळ्याला फास लावणारा रंगराजन समितीचा अहवाल संपुआ सरकारनं स्वीकारला. त्याआधीचा शेतकऱ्यांना झुकतं माप देणारा, उत्पादन खर्चावर पन्नास टक्के नफ्याची हमी देणारा स्वामीनाथन समितीचा अहवाल कचऱ्याच्या पेटीत फेकून दिला.

रंगराजन समितीने ऊसाचा दर जागतिक साखर दराशी जोडून शेतकऱ्याला अस्थिरतेच्या गर्तेत ढकलून दिलं. राजू शेट्टींच्या स्वाभिमानी संघटनेनं रंगराजन समितीचं स्वागत करायची भूमिका घेतली. एवढेच नव्हे, तर आपले गुरू शरद जोशी यांचा पाढा गिरवत तेही 'जातीयवादी गिधाडांच्या' थव्यात बेमुर्वतपणे सहभागी झाले.

रंगराजन समिती, स्वामीनाथन समिती या दोन समित्यांच्या शिफारशीमागील फरक ऊस उत्पादकांना समजला पाहिजे, म्हणून पानसरेंनी स्वभावानुसार लेखणी उचलली. रंगराजन समितीच्या अहवालाचं मराठीत भाषांतर कर असं मला फर्मान काढलं. माझ भाषांतर त्या पुस्तिकेत समाविष्ट केलं. दोन्ही पर्यायी भूमिकांवर ऊस उत्पादक शेतकरी चर्चा करू लागले. मोदींनी 'स्वामीनाथन समितीच्या अहवालाची अंलबजावणी करू', असं सांगत राजू शेट्टींना गुगली टाकत त्यांची दांडी उडवली. निवडून आल्यावर सुप्रिम कोर्टात ते शक्य नाही, असं प्रतिज्ञापत्रच मोदी सरकारनं सादर करत शेट्टींच्या हातात भला थोरला भोपळा दिला. तरीही शेतकऱ्यांसमोर बगॅस टाकून खासदार राजू शेट्टींची संघटना सत्तेच्या साखरेचा आणि उपपदार्थांचा स्वाद घेऊ लागली आहे. आज पानसरे असते, तर त्यांनी त्यांची यथेच्छ कानउघाडणी केली असती, आणि खासदारांना ती निमूटपणे ऐकून घेण्यावाचून गत्यंतर राहिलं नसतं.

मोदी आणि भाजप हे तद्दन कामगारविरोधी आहेत, हे पानसरे सांगत असत. झालंही तसंच. राजस्थानातील भाजपच्या सरकारनं जागतिक बँकेचा कामगारविरोधी फंडा देशात पहिल्यांदा राबवायला सुरवात केली. देशातील सरकारची पावलं कुठं वळत आहेत, कॉ. पानसरेंच्या चाणाक्ष मार्क्सवादी नजरेनं ओळखून त्याचं वास्तव मराठी कामगारांपुढे मांडायचं ठरवलं. त्यांनी एक इंग्रजी पुस्तिका माझ्यापुढे टाकली आणि म्हणाले, ताबडतोब मराठीत करून दे. पुस्तिका छापून वितरीतही केली. तेच धोरण पुढे केंद्र सरकारनं राबवायला सुरवात केली. त्याच्या विरोधात देशभर २ सप्टेंबर २०१५ आणि २ सप्टेंबर २०१६ रोजी दोन देशव्यापी संप झाले. या संपात अनुक्रमे १५ आणि २० लाख कामगार - कर्मचारी सहभागी झाले. या दोन्ही संपाच्या आधीच प्रतिगाम्यांनी, सनातन्यांनी पानसरेंचा बळी घेतला. पण जाण्याआधी या दोन्ही संपांना वैचारिक रसद पुरवणारी तरतूद त्यांनी करून ठेवली होती.

आयुष्यात जरासे उशिरा का असेना मला कॉ. पानसरेंच्या शब्द-कृती-प्रकल्पात सहभागी होता आलं. त्यात माझ्या प्रयत्नांपेक्षा पानसरेंच्या सततच्या पाठपुराव्याचाच भाग जास्त होता. मलाही ते सांगतील ते काम करण्यात आनंद वाटे. त्यांना माझ्या पत्नीच्या, मायाच्या हातचा तांबडा - पांढरा आवडत असे. २०१५ सालच्या नोव्हेंबरमध्ये एका रात्री त्यांना आणि उमाताईंना आम्ही सहजच जेवायला बोलावलं होतं. सोबत आमचे मित्र प्रा. शरद नावरेही होते. जेवण झाल्यावर पानसरे म्हणाले, आज माझा वाढदिवस. आम्हाला ठाऊकही नव्हतं. अभावितपणे त्यांचा वाढदिवस आम्ही साजरा केला होता. मग आम्ही मुद्दाम आईसक्रीम खायला गेलो. त्यांचं खाण्यावर प्रेम होतं. गाण्यावरही होतं. येरवडा जेलमध्ये असताना त्यांनी आम्हाला खूप गाणी म्हणून दाखवली होती. २६ नोव्हेंबर २०१५ हा त्यांचा शेवटचाच वाढदिवस असेल, हे आमच्या गावीही नव्हतं. पण त्या दिवशीही कट शिजवणारे जागे असणारच. बोलता बोलता आम्हा तिघांना उद्देशून पानसरे मार्मिकपणे म्हणाले, 'मी उदयला काही काम सांगितलं आणि त्यानं ते केलं नाही, असं कधी घडलं नाही ?' त्यांच्या शेवटच्या वाढदिवशी तेच मला ही प्रशस्तीपत्राची अपूर्व भेट देऊन गेले.

एके दिवशी सकाळी त्यांच्या मॉर्निंग वॉकवेळी शिवाजी विद्यापीठात पानसरे भेटले. माझा एक संकल्प त्यांना सांगितला, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीची सर्वंकष चिकित्सा करणारं पुस्तक लिहायचं आहे.' ते म्हणाले, लवकर लिही. पानसरे असते तर गेल्या दोन वर्षात त्यांनी निश्चितच लिहून घेतलं असतं. बेलाशक सांगतो, कॉम्रेड, लिहायलाच हवं. त्याशिवाय तुम्ही सोपवलेला शब्द-कृती-प्रकल्प कसा पुरा होईल ? ★ ★ ★


# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी

## जीवनमार्ग - रु. ४००, लोकलहर - रु. २५०

## पीपल्स डेमॉक्रसी - रु. ३५०, मार्क्सिस्ट - रु. १००

*आपल्या संपूर्ण पत्त्यासहित मनी ऑर्डर/बँक ड्राफ्टने वर्गणी पाठविण्याचे पत्ते*

व्यवस्थापक, जीवनमार्ग, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३

(चेक/ड्राफ्ट फक्त 'जीवनमार्ग' या नावे पाठवावा)

इतर मुखपत्रे : मॅनेजर, लोकलहर/पीपल्स डेमॉक्रसी/मार्क्सिस्ट, १५ तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११०००१

# अ.भा. विमा कर्मचारी संघटनेच्या २४वे अधिवेशनाने दिली ऐक्य, आत्मविश्वास व एकत्रीकरणाची हाक




अ.भा. विमा कर्मचारी संघटनेचे २४ वे अधिवेशन कोची येथे २१-२५ जानेवारी रोजी पार पडले. संघटनेच्या इतिहासात पहिल्यांदाच केरळ राज्यात अधिवेशन आयोजित केले गेले होते.

अधिवेशनाची सुरुवात एका प्रचंड रॅलीने झाली. त्यात देशभरातून आलेले ६००० कर्मचारी सामील झाले होते. संघटनेचे माजी उपाध्यक्ष सी. रविंद्रनाथन यांनी झेंडा दाखवल्यावर रॅली राजेंद्र मैदान येथून निघाली. रॅलीच्या अग्रभागी केरळचे पारंपारिक 'पंचवाद्यम' होते. त्यानंतर २४ महिला सदस्य संघटनेचा ध्वज घेऊन चालत होत्या. त्यापाठोपाठ पदाधिकारी व सदस्य सामील झाले होते. रॅलीचे स्वागत वाटेत वेगवेगळ्या भ्रातृभावी संघटनांनी केले. स्वागत स्वीकारीत ही भव्य रॅली फिडेल कॅस्ट्रो नगर येथे पोहोचल्यावर कॉ. अमातुल्लाखान, अध्यक्ष, एआयआयइए यांनी वेगवेगळ्या भाषांमधील घोषणांच्या निनादांत ध्वजारोहण केले.

उद्घाटन सत्राची सुरुवात अमातुल्लाखान यांच्या अध्यक्षतेखाली झाली. स्वागत समिती अध्यक्ष वा माजी खासदार पी. राजीव यांनी प्रचंड संख्येने आलेल्या लोकांचे स्वागत केले. त्यानंतर केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन यांनी त्यांच्या उद्घाटन भाषणात संघटनेच्या सार्वजनिक क्षेत्रांतील विमा संस्थांच्या संरक्षण व सबलीकरणाच्या योगदानाचे कौतुक केले. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विमा संस्थांच्या मालमत्तेवर डोळा आहे, याबद्दल सावधानतेचा इशारा दिला. आणि त्याचबरोबर संघटनेच्या पुढील सर्व लढ्यांना माकपचा संपूर्ण पाठींबा असेल, असे आश्वासन त्यांनी दिले.

त्यानंतर सीटूचे अखिल भारतीय उपाध्यक्ष ए. के. पद्मनाभन, केंद्रीय कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस एम. कृष्णन्, बीएसएनएल कर्मचारी संघटनेचे सेक्रेटरी पी. अभिमन्यु, इन्शुरन्स पेन्शनर संघटनेचे टी. के. चक्रवर्ती यांनी अधिवेशनास शुभेच्छा दिल्या. उद्घाटन सत्राचा समारोप व्ही. रमेश यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी व्ही. रमेश यांनी संघटनेचा अहवाल सादर केला. या अहवालावरील चर्चेत ४ महिलांसह ५१ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. सत्राची सुरुवात संघटनेच्या सहसचिव एम. गिरीजा यांनी केली.

विमा संघटनेच्या चळवळीतील अद्धर्यू चंद्रशेखर व एन. एम. सुंदरम् यांची उपस्थिती व अनुभवाच्या बोलांनी प्रतिनिधींना प्रेरित केले. 'बेफी' या बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे सरचिटणीस प्रदीप विश्वास यांनीही अधिवेशनास शुभेच्छा दिल्या. सीटूचे सरचिटणीस खासदार तपन सेन यांचे मौलिक विचार ऐकण्याची संधी अधिवेशनाला मिळाली. त्यांनी सद्यस्थितीची जाणीव व जगाला ग्रासलेले आर्थिक संकट व त्यामुळे कामगारांवर होणारे परिणाम याची माहिती दिली. संघटनेचे धोरण या परिस्थितीनुसार बदलणे व ते सर्वसमावेशक करण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. पी. राजीव यांनी केरळ राज्याच्या विकास मॉडेलची प्रतिनिधींना माहिती दिली.

या व्यतिरिक्त अधिवेशनात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कवी व साहित्य अकादमीचे माजी सचिव प्रा. के. सतिशचंद्रन तसेच जामीया-मिलीया इस्लामिया विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख रविंद्र गोपीनाथ यांचीही भाषणे ऐकण्याची संधी प्रतिनिधींना मिळाली.

अधिवेशनाने १८ ठराव एकमताने संमत केले. त्यात नवउदारमतवादी धोरणांना विरोध, जातीयवादाला विरोध व जातीय सलोख्यासाठी प्रयत्न, असंवेदनशील नोटाबंदीला विरोध, महिला व अनुसूचित जाती तसेच जमाती यांचे सक्षमीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे बळकटीकरण, असंघटित कामगारांचे लढे, विमाक्षेत्रातील नोकर भरती यांजबरोबर 'एआयआयइए'ला मान्यता व सामुहिक चर्चेचा हक्क मिळवणे अशा ठरावांचा समावेश होता.


याजबरोबर अधिवेशनाने सदस्यांना खालील लढ्याची हाक दिली.

१) सार्वजनिक क्षेत्रातील विमा उद्योगांच्या संरक्षणासाठी अविरत लढा देणे. २) सार्वजनिक विमा क्षेत्रातील कंपन्यांच्या खाजगीकरणाला विरोध करणे व त्याविषयी जागरुकता निर्माण करणे. ३) खाजगी विमा कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांचे अ.भा. अधिवेशन दिल्ली येथे मार्च २०१७ पर्यंत आयोजित करणे. ४) सार्वजनिक विमा कंपन्यांनी सेबीला खाजगीकरणाबाबत अनुकुलता दर्शवली, तर त्या विरोधात त्वरित निदर्शने करणे. सार्वजनिक क्षेत्रातील विमा- बाबत सेबीला सूचना दिल्याबरोबर निदर्शने आयोजित करणे. ५) तसेच 'जीआयसी'मधील भागभांडवल विक्रीस आल्यावर एक दिवसाचा संप आयोजित करणे. ६) अतिरिक्त पेन्शन ऑप्शनसाठी पाठपुरावा करणे. ७) वेगवेगळ्या प्रलंबित मागण्यांसाठी लढा व पाठपुरावा करणे. ८) सद्यस्थितीतील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संघटनेला मजबूत करणे व सदस्यांना त्यासाठी तयार करणे.

अधिवेशनाने सर्वानुमते अमातुल्लाखान यांची अध्यक्ष, व्ही. रमेश यांची सरचिटणीस व बी. एस. रवि यांची खजिनदार म्हणून निवड केली. तसेच १६८ सदस्यांची कार्यकारिणीही निवडण्यात आली. घोषणांच्या निनादांत अधिवेशनाची सांगता झाली.

**(अनुवाद : गौरी महाबळेश्वरकर-देशपांडे)**

# कॉ. लाडक गिंभल यांना अखेरचा लाल सलाम !




मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे दादरा-नगर हवेलीचे माजी सेक्रेटरी कॉ. लाडक गिंभल रा. कुटली, दादरा-नगर हवेली यांचे वयाच्या ६७व्या वर्षी आपल्या राहत्या घरी अलीकडे निधन झाले. गेली कित्येक वर्षे पक्ष सभासद व किसान सभेचे नेते असलेल्या कॉ. लाडक गिंभल यांनी दादरा-नगर हवेलीची लोकसभेची निवडणूक अनेक वेळा पक्षातर्फे लढवली होती.

किसान सभेचे नेते या नात्याने त्यांनी दादरा-नगर हवेलीत सिंचनासाठी बंधाऱ्यांची एक अभिनव योजना मांडली होती. ते बंधारे प्रशासनाने बांधून त्यांना 'गिंभल बंधारे' हे नाव दिले होते, हे विशेष.

त्यांच्या निधनाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची मोठी हानी झाली आहे. 'जीवनमार्ग' कॉ. लाडक गिंभल यांचा परिवार व दादरा नगर हवेलीतील सर्व पक्ष कार्यकर्त्यांच्या दु:खात सहभागी आहे. त्यांच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते तरुण पिढीतून निर्माण करणे, हीच कॉ. लाडक गिंभल यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**कॉ. लाडक गिंभल यांना अखेरचा लाल सलाम!**

# कॉ. प्रा. एस. एस. पाटील यांना अखेरचा लाल सलाम !



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सातारा जिल्हा कमिटीचे सदस्य, शिवाजी युनिव्हर्सिटी कोल्हापूर टिचर्स युनियनचे (सुटा) संस्थापक सदस्य व समाजवादी प्रबोधिनीचे मार्गदर्शक कॉम्रेड प्रा. एस. एस. पाटील यांचे ६ फेब्रुवारी २०१७ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांना संघटीत करून त्यांची युनियन स्थापन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. संघटनेच्यावतीने प्राध्यापकांच्या अनेक प्रश्नांची सोडवूणक त्यांनी केली. त्यांच्या प्रयत्नानेच साताऱ्यात 'सुटा'ची भव्य वास्तु उभारली. पुरोगामी चळवळींचे अनेक कार्यक्रम व बैठका येथे आयोजित करण्यात येतात.

सातारा शहरात कामगार-कर्मचारी संघटना कृती समितीची स्थापना करण्यातही त्यांचा पुढाकार होता. डॉ. नरेंद्र दाभोलकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्यांनंतर सातारा शहरातील पुरोगामी संघटना तसेच व्यक्तींना संघटीत करून झालेल्या जोरदार निषेध आंदोलनात ते अग्रभागी होते. त्यांच्या निधनामुळे माकपचे व सातारा जिल्ह्यातील पुरोगामी चळवळीचे कधीही न भरणारे नुकसान झाले आहे. **'जीवनमार्ग'च्या वतीने कॉ. प्रा. एस. एस. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

# मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...

*मानवतेचा धर्म एक असता*
*धोक्यात आली लोकशाही,*
*मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...*

*रक्ताचे हो पूर वाहिले,*
*जातीयतेचे तांडव माजले,*
*गरीब जनता भयभीत केली,*
*समानतेच्या थापा मारूनी,*
*दंगलीची ही नांदी*
*मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...*

*'अच्छे दिना'चे नावाने हो*
*फसविले सारे भारतवाशी,*
*महागाईचा डोंगर माथी,*
*पिळवीत आले तुम्ही आपली*
*जनता साधी भोळी,*
*मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...*

*कर्मकांडी हे सत्तेवाले*
*मनुवाद्यांचे भक्त सारे,*
*गोमातेचे हत्यारे हेच,*
*एकजुटीने फाडून टाकू,*
*छप्पन इंची छाती*
*मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...*

*दुनियाचे हे आतंकवादी*
*दहलून सोडती भारतवाशी,*
*कुणी व्याकुळ कुणी उपाशी*
*गुजरातमध्ये पाहिली आम्ही*
*मोदीची सैतानी*
*मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...*

*शापामोहन सांगतो तुम्हा*
*गरीबांची ही सारी दैना,*
*या सत्तेला उलथून देण्या,*
*देशामध्ये बांधत नेवू*
*लालझेंड्याची टोळी.*
*मोदीचं हे सरकार आहे जातीयवादी...*

**– दिलीप शापामोहन**

# पक्षाच्या राज्य सचिवमंडळाची व राज्य कमिटीची बैठक

## बेलापूर - दि. २४ मार्च २०१७

नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निकाल व त्यातील आपल्या पक्षाची कामगिरी यांचा आढावा घेण्यासाठी पक्षाच्या राज्य सचिवमंडळाची बैठक शुक्रवार, दि. २४ मार्च २०१७ रोजी सकाळी ११ वाजता, आणि राज्य कमिटीची बैठक त्याच दिवशी दुपारी ३ वाजता, कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर येथे भरेल. पक्षाचे केंद्रीय सचिवमंडळ सदस्य निलोत्पल बसू हजर राहतील.

सर्व सदस्यांनी (१) यंदाच्या महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व नगरपालिकांच्या निवडणुकीचा आपल्या जिल्ह्यातील राजकीय आढावा, (२) वरील सर्व निवडणुकींत आपल्या पक्षाच्या उमेदवारांना मिळालेली नेमकी मते (लेखी स्वरूपात), (३) राज्य कमिटी सभासदांची वर्गणी व लेव्ही, (४) पक्ष, ‘जनशक्ती प्रकाशन’ व ‘जीवनमार्ग’ची सर्व थकबाकी आणि (५) सर्व पक्ष मुखपत्रांच्या वर्गण्या, या साहित्यासह या बैठकीसाठी अवश्य वेळेवर हजर राहावे.

**– नरसय्या आडम, राज्य सेक्रेटरी**

# पक्षाची विस्तारित राज्य कमिटी बैठक

## बेलापूर - दि. २५-२६ मार्च २०१७

कोलकाता पक्ष संघटना प्लीनमने दिलेल्या निर्देशानुसार, महाराष्ट्रातील पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पक्षाची विस्तारित राज्य कमिटी बैठक शनिवार, दि. २५ मार्च २०१७ रोजी सकाळी ११ वाजता कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे सुरू होईल व ती रविवार, दि. २६ मार्च रोजी सायंकाळी संपेल. या बैठकीसाठी पक्षाचे सरचिटणीस खासदार सीताराम येचुरी व केंद्रीय सचिवमंडळ सदस्य निलोत्पल बसू हजर राहतील.

राज्य कमिटीत ठरल्यानुसार, प्रत्येक जिल्ह्याने २०० पक्ष सभासद व उमेदवारांमागे १ प्रतिनिधी या बैठकीसाठी निवडायचा आहे. सर्व राज्य कमिटी सदस्य पदसिद्ध प्रतिनिधी असतील. तसेच सहा मुख्य जनआघाड्यांचे राज्य अध्यक्ष व राज्य सचिव हेही पदसिद्ध प्रतिनिधी असतील. या बैठकीची प्रतिनिधी फी प्रत्येकी रु. ४०० असेल व ती राज्य कमिटी सदस्यांसह सर्व प्रतिनिधींना भरायची आहे. सर्व जिल्ह्यांचे या महत्त्वाच्या बैठकीत प्रतिनिधित्व असले पाहिजे.

**– नरसय्या आडम, राज्य सेक्रेटरी**

# महाराष्ट्र राज्य किसान कौन्सिल बैठक

## बेलापूर - दि. २७ मार्च २०१७

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रविवार, दि. २६ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आणि राज्य कौन्सिलची बैठक सोमवार, दि. २७ मार्च रोजी सकाळी १० वाजता कॉ. बी. टी. रणदिवे भवन, बेलापूर येथे भरेल. राज्य कौन्सिलची बैठक त्याच दिवशी सायंकाळी संपेल.

सर्व सदस्यांनी या बैठकीसाठी अवश्य हजर राहावे आणि येताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील आपल्या कार्याचा अहवाल, २०१६-१७ ची जिल्ह्यातील सर्व सभासदवर्गणी आणि काउंटरफॉईल्स आणि किसान सभेच्या सर्व साहित्याची थकबाकी हे साहित्य अवश्य सोबत घेऊन यावे.

| **किसन गुजर**<br>**अध्यक्ष** | **अर्जुन आडे**<br>**कार्याध्यक्ष** | **डॉ. अजित नवले**<br>**सरचिटणीस** |
|---|---|---|

# ठाणे-पालघर : पक्षाच्या ७ तालुका शिबिरांत सुमारे २००० कार्यकर्त्यांचा उत्साही सहभाग

(पान १६ वरून)

यांपैकी पाच शिबिरांमध्ये पक्षाचे केंद्रीय सचिवमंडळ सदस्य डॉ. अशोक ढवळे यांनी चार विषय सोप्या पद्धतीने मांडले :- १) मार्क्सवादी राजकारण - वर्ग, वर्गसंघर्ष, शासनसंस्था, क्रांती व समाजवादाच्या संकल्पना, २) समाजवादी क्रांत्यांची तोंडओळख - रशिया, चीन, व्हिएतनाम व क्युबा येथील क्रांत्या. ३) भारतीय क्रांतीची आपली संकल्पना (पक्ष कार्यक्रम) आणि सद्य राजकीय आव्हानांत मुख्यत: रा. स्व. संघ-भाजपच्या सरकारांची नवउदारवादी धोरणे व धर्मांध कारस्थानांचा धोका, ४) पक्ष संघटना (पक्ष घटना) व जनसंघटनांची बांधणी. उर्वरित दोन शिबिरांमध्ये, डहाणूच्या शिबिरात पहिले दोन विषय पक्षाचे ज्येष्ठ नेते एल. बी. धनगर यांनी तर शहापूरच्या शिबिरात पहिले दोन विषय पक्षाच्या जिल्हा सचिवमंडळ सदस्या प्राची हातिवलेकर यांनी घेतले. या दोन्ही शिबिरांत दुसरे दोन विषय पक्षाचे राज्य सचिवमंडळ सदस्य व जिल्हा सचिव बारक्या मांगात यांनी घेतले. उर्वरित शिबिरांत बारक्या मांगात यांनी शिबिराचे उद्घाटन अथवा समारोप केला.

पक्षाचे राज्य सचिवमंडळ सदस्य किसन गुजर यांनी जव्हार-मोखाड्याच्या शिबिराचे उद्घाटन केले. पक्षाचे राज्य कमिटी सदस्य रतन बुधर, सुनिल धानवा व लहानी दौडा, जिल्हा सचिवमंडळ सदस्य रडका कलांगडा, वनशा दुमाडा, लक्ष्मण डोंबरे, विनोद निकोले, यशवंत घाटाळ, किरण गहला, सुदाम धिंडा व जिल्हा कमिटी सदस्य सुनिल करपट, मधुकर डोवला व हीना वनगा यांनी विविध शिबिरांचे सूत्रसंचालन केले.

या शिबिरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एकूण रु. ४०,८४७च्या पक्ष साहित्याची या सर्व शिबिरांमध्ये उत्तम विक्री झाली. या सर्व शिबिरांमध्ये खास करून पक्षाच्या व किसान सभेच्या उत्तुंग नेत्या आणि ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक आदिवासी उठावाच्या प्रणेत्या कॉ. गोदावरी परुळेकर यांनी लिहिलेल्या ''जेव्हा माणूस जागा होतो'' या गाजलेल्या पुस्तकाच्या २७० प्रती विकल्या गेल्या. तसेच पक्षाची व 'जनशक्ती प्रकाशना'ची इतर पुस्तके आणि 'जीवनमार्ग' व 'किसान संघर्ष' यांचीही उत्साही विक्री झाली.

या सर्व शिबिरांनंतर पक्षाचे तालुका व विभाग कमिटी सदस्य आणि युनिट सेक्रेटरींची विस्तारित बैठक घेण्यात येऊन पुढील कार्ये ठरविण्यात आली. जिल्हा व तालुकास्तरीय तसेच स्थानिक प्रश्नांवरील संघर्षांवर भर देणे, २०१७चे पक्ष सभासद नूतनीकरण केंद्रीय कमिटी व राज्य कमिटीच्या मार्गदर्शनानुसार यंदा कटाक्षाने करणे, पक्षाच्या तालुका व विभाग कमिट्या आणि विशेषत: पक्षाची युनिट्स यांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल करून ती नियमित व रेखीव करणे, सर्व जनसंघटनांच्या सभासदनोंदणीला आणि स्वतंत्र व लोकशाही कार्यपद्धतीला जोरदार चालना देणे आणि पक्षाच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या मानधनाची गरज भागविण्यासाठी काढण्यात येणाऱ्या जिल्हा कमिटीच्या विशेष स्मरणिकेसाठी अधिकाधिक जाहिराती जमा करणे अशी महत्त्वाची कार्ये या सर्व शिबिरांमध्ये निश्चित करण्यात आली.

**– बारक्या मांगात**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा विजय

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने महाराष्ट्रात जिंकलेल्या जागा पुढीलप्रमाणे: जिल्हा नाशिक - ३ जि.प. आणि ७ पं.स. जागा सुरगाणा आणि त्र्यंबक तालुक्यात; सुरगाणा पंचायत समिती ६ पैकी ५ जागा घेऊन पक्षाने पुन्हा जिंकली; जिल्हा सोलापूर - महानगरपालिकेची १ जागा; जिल्हा परभणी - पं.स.ची १ जागा परभणी तालुक्यात; जिल्हा बीड - पं.स.ची १ जागा परळी तालुक्यात; जिल्हा यवतमाळ - पं.स.ची १ जागा महागाव तालुक्यात; नोव्हेंबर २०१६च्या नगरपालिका निवडणुकीत वर्धा जिल्ह्यात तलासरी नगर पंचायतीत १७ पैकी ११ जागा जिंकून नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष पदे पक्षाने जिंकली. जिल्हा विभाजनामुळे २०१५ साली झालेल्या निवडणुकीत ठाणे-पालघर जिल्ह्यात तलासरी, डहाणू, जव्हार, विक्रमगड व मुरबाड या ५ तालुक्यांत पक्षाने एकूण ५ जि.प. जागा आणि ११ पं.स. जागा जिंकून तलासरी पंचायत समिती पुन्हा जिंकली.

त्याशिवाय आज लागलेल्या निकालात अनेक जिल्ह्यांतील महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत पक्षाला अनेक जागांवर चांगली मते मिळाली आणि काही जागा आपण अत्यल्प मतांनी हरलो. या निवडणुकीत अहोरात्र मेहनत करणाऱ्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

★ ★ ★